Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0021

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

# आदिवासी जमातींच्या कल्याणकारी योजनांचे अर्थशास्त्रीय अध्ययन

**विकास सं. ढोले**
संशोधक विद्यार्थी.
एम. ए. अर्थशास्त्र.
सामाजिक शस्त्र संकुल.
स्वा. रा. ती. म. वि.नांदेड.
मो. नं.9579228839

**प्रा. डॉ. डि. के मगर**
अर्थशास्त्र विभाग
ह. ज. पा. माध्यमिक विद्यालय.
हिमायतनगर ता. हिमायतनगर. जिल्हा . नांदेड.
मो. नं. 9604531670

**सारांश**

अनुसूचित जमातीमध्ये आदिवासी सर्वात मागासलेले अशिक्षित साधे जीवन जगणारे जंगलात राहणारे लोक आहेत. या जमातीमध्ये निरक्षरता त्याचे अनेक समस्येची मूळ कारण आहे. निरक्षरतेमुळे त्यांच्यामध्ये अनेक अंधविश्वास व कुसंस्कार आढळतात. आदिवासी जमातीमध्ये अशिक्षितपणा असल्यामुळे आजही ते अंधकारमय जीवन जगत आहेत. आदिवासी समाज म्हणजे प्रगत समाजापासून अलिप्त असलेल्या दूर रानावनात डोंगर दऱ्यात वास्तव करणारा आणि धर्म बोलीभाषा इत्यादी बाबतीत समानता असलेला असा साधा सामाजिक समूह होय. हा समाज पूर्वीपासूनच डोंगर भागात वास्तव्य करीत असल्याने या समाजाचा सामाजिक आर्थिक शैक्षणिक विकास हवा तेवढ्या प्रमाणात झालेला दिसून येत नाही.

**मुख्य शब्द -** आदिवासी जमाती,कल्याणकारी योजना, अर्थशास्त्रीय अध्ययन

**१.प्रस्तावना-**

महाराष्ट्र राज्याचे भोगोलिक क्षेत्र ३.०७ लक्ष चौरस किमी असून त्यातील ०.५० लक्ष चौरस की मी क्षेत्र आदिवासी उपयोजना क्षेत्रखाली येते. १९९१ जनगणनेनुसार राज्यातील आदिवासी लोकसंख्या ७३.१८ लक्ष एवढी आहे महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी ९.२७ टक्के लोकसंख्या आदिवासी आहे. आदिवासी लोक शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले आहेत. राज्यातील साक्षरतेचे प्रमाण 47 टक्के आहे. तर आदिवासी मध्ये हे प्रमाण 36.77% आहे. स्त्री शिक्षणाचे प्रमाण आदिवासी मध्ये फार कमी म्हणजे फक्त 24.3% आढळून येते. आदिवासी आर्थिक दृष्ट्या फारच मागासलेल्या आहेत. त्यांचा मुख्य धंदा शेतीचा आहेआदिवासीं जामातीच्या कल्याणकारी योजनामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला आहे का?

त्यांचे जीवनमान सुधारले आहे का? सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारणा झाली का? आरोग्य, दारिद्र्य, कुपोषण, स्थानांतर याचे प्रमाण कमी झाले आहे का? प्रथा परंपरा अंधश्रद्धा व्यसनधीनता यांचा पगडा कमी झाला का? आदिवासी कल्याणकारी योजनेची पूरेपूर अंमलबजावणी केली जाते का? या हेतूने कल्याणकारी योजनाचे अध्ययन

करणे अतिशय महत्त्वाचे आहे. सुमारे 85 टक्के लोक शेतीवर उपजीविका . भगवितात. त्यात 40 टक्के लोक शेती करणारे व 45% शेतमजूरी आहेत.

शेती व्यतिरिक्त आदिवासी लोक चट्टया टोपल्या तयार करणे, जंगलातील वनौपजे गोळा करणे,गवत कापणे इत्यादी धंदे करतात. त्याची राहणी साधी व. गरजा मर्यादित आहेत. सर्वसामान्य आदिवासी भोळाभाबडा अबोल त्रयस्थाबरोबर शक्यतो बोलण्याची टाळणारा, प्रामाणिक, दैववादी,परंपरागत जीवनसृष्टीचा निसर्गाच्या सानिध्यात रमणारा स्वच्छतेने आनंद लुटणार असतो. आदिवासी समाजा पूर्वीपासून जमीन गुरेढोरे बकऱ्या कोंबड्या, मासे, खेकडे, आणि शेतात राबण्यासाठी मजबूत हात पाय परंपरागत संपत्ती आहे. आपल्याला हवे आहे ते निसर्गातून सभोवतालच्या साधनातून मिळवण्याची शक्यता असेल तर आदिवासी स्वतःला आजही अत्यंत सुखी समजतो. आदिवासीच्या धार्मिक रूढी ह्या निसर्ग आणि प्राणी पुजणेतून निर्माण झाले आहेत. निसर्गातील गोड अनाकालनीय ते सर्व पूजनही असे मानतात. आकाशात चमकणारी वीज, सूर्य, चंद्र, तारे, ढग, प्रचंड वृक्ष वाघ सिंह अशा निसर्गनिर्मित सजीव निर्जीव वस्तूची पूजा करतात. त्याच्यात वाघदेव, डोंगर देव,चिंता व गावदेव इत्यादी देवदेवता आहेत. आदिवासी मध्ये धार्मिक आणि सामाजिक विधीला मध्याला,दारूला विशेष स्थान असते. जन्म, मृत्यू, लग्न, पंचायत, पाहुण्याचा आदर सत्कार,घेणे देणे कोणत्याही निमित्ताने एकत्र येणे झाले की दारू घेण्याचा कार्यक्रम होतो.काही जमाती स्त्रिया मुले देखील दारू पितात. जन्मापासूनच त्यांची सवय असते. मूल जन्मल्यानंतर मुलाचा तोंडात दारूचा थेंब टाकला नाही, तर ते मुल नशीबवान निघणार नाही असा त्यांच्यात गैरसमज आहेत.

मरण पावलेल्या माणसाच्या तोंडातही दारूचा थेंब घालावा लागतो. मनुष्याला मृत्यू आला तर प्रेत जागण्यासाठी लोकांना दारू देण्याची व प्रेत वाहून नेणाऱ्या नाही दारू देण्याची प्रथा आदिवासी जमातीत आढळते. आदिवासी जमाती जंगल दर्याखोऱ्यात राहत असल्यामुळे वर्षातून कित्येक दिवस आदिवासींना शुद्ध स्वच्छ मी भरपूर पाणी मिळत नाही अपुरावा निकृष्ट आहार स्वच्छ पाणी यामुळे मलेरिया हगवण पोटाचे आजार कातडीचे रोग यांच्याशी त्यांना सामना करावा लागतो. रोगराई संबंधाच्या त्यांच्या कल्पना परंपरागत आहेत डॉक्टरांच्या औषधापेक्षा भक्ताच्या अंगाऱ्याधुपऱ्या वर त्यांचा अधिक विश्वास आहे. त्यामुळे आदिवासी जमातीमध्ये कुपोषणही मोठ्या प्रमाणावर आढळते. सन 1975 - 76 साली राज्याला आदिवासी उपयोजना लागू झाली. त्यामुळे विकास कार्याची दिशा केवळ कल्याणकारी योजना अशी न राहता ती विकास योजना Welfare Schemes to Development Schemes अशी करण्यात आली . समूह विकासाबरोबर क्षेत्र विकास असे नियोजनाचे सूत्र ठरविण्यात आले आदिवासीचे जीवन उदा: जमीन ,जंगल, जलनिर्भर आहे त्यांच्या विकास कार्यक्रमातून आदिवासींना संपन्न साधनसामग्रीचा फायदा मिळेल असा दृष्टिकोन स्वीकारण्यात आला.

**२.योजनाची उद्दिष्टे**

https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0021
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

१ आदिवासी जमातीच्या लोकसंख्येचे अध्ययन करणे.

२ आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनांची अध्ययन करणे.

३आदिवासी जमातीच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन.

४ आदिवासी जमातीच्या आरोग्य स्थितीचे अध्ययन करणे .

५ आदिवासी जमातीचे शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करणे.

**३.संशोधन पद्धती**

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर केलेला आहे. आदिवासी जमातींच्या कल्याणकारी योजनाच्या अभ्यासासाठी आवश्यक असणारी माहिती दुय्यम माहिती संकलन साधनाच्या आधार घेऊन करण्यात आलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने दैनंदिन वर्तमानपत्रातील लेख, मासिके, अहवाल आणि इंटरनेट च्या माध्यमातून माहिती संकलित करून तयार करण्यात आलेली आहे

**४. आदिवासीं समाजाचा लोकसंख्येचे अध्ययन करणे**

महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र 3,07,713 चौ कि मी असून त्यापैकी 50,757 कि मी क्षेत्र आदिवासी उपयोजना खाली येते याचे प्रमाण 16.5% होते. गेल्या तीन दशकातील राज्याची लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या याची तुलनात्मक आकडेवारी खाली देण्यात आली आहे.

**आदिवासी समाजाची लोकसंख्या**

| जनगणना वर्ष | राज्याची एकूण लोकसंख्या लाखात | आदिवासी लोकसंख्या लाखात | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1971 | 504.12 | 38.41 | 7.62 |
| 1981 | 627.84 | 57.72 | 9.19 |
| 9191 | 789.37 | 73.18 | 9.27 |
| 2001 | 968.79 | 85.77 | 8.85 |
| 2011 | 1123.64 | 105.10 | 9.37 |

संदर्भ वार्षिक आदिवासी उपयोजना 2007 ते 2008

- 1981 ते 1991 या दशकातील राज्यातील एकूण लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या याची तुलना केल्यास अशी दिसून येते की, आदिवासी लोकसंख्येच्या वाढीची टक्केवारी कमी अधिक प्रमाणात सातत्याने 9.00 ते 9.20 एवढी राहिलेली आहे. तथापि 201 1 च्या जनगणनेनुसार प्रथमच 9 टक्केपेक्षा आदिवासी लोकसंख्या कमी झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात भिल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकूर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलम (यवतमाळ जिल्हा), कातकरी मुख्यतः (रायगड व ठाणे जिल्हा) आणि माडिया (गडचिरोली जिल्हा) या केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या अशा तीन जमाती आहेत. राज्यात एकूण 35 जिल्हे आहेत आणि आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक व ठाणे (सह्याद्री

प्रदेश) चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ (गोंडवान प्रदेश) या पूर्वेकडील वणाच्छादित जिल्ह्यामध्ये मुख्यता अधिक आढळते.

**5 आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनेचे अध्ययन करणे**

भारतीय संविधानाच्या एका मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील दुर्बन घटक विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घ्यावी आणि त्याचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणुकीपासून संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. आदिवासीं जामातीच्या कल्याणकारी योजनामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला आहे का? त्यांचे जीवनमान सुधारले आहे का? सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारणा झाली का? आरोग्य, दारिद्र्य, कुपोषण, स्थानांतर याचे प्रमाण कमी झाले आहे का? प्रथा परंपरा अंधश्रद्धा व्यसनधीनता यांचा पगडा कमी झाला का? आदिवासी कल्याणकारी योजनेची पूरेपूर अंमलबजावणी केली जाते का? या हेतूने कल्याणकारी योजनाचे अध्ययन करणे अतिशय महत्त्वाचे आहे.

2001 च्या जनगणनेनुसार अनुसूचित जमातीची लोकसंख्या 85.77 लक्ष आहे आणि एकूण लोकसंख्येत अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी सुमारे 8.5 आहे. आदिवासी लोकांची लोकसंख्या विचारात घेता अनुसूचत जमातीच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी राज्य शासनाने आदिवासी उपयोजनेमध्ये पुरेशी तरतूद करण्यात आली आहे. आदिवासींच्या कल्याणासाठी आदिवासी उपयोजनेत शिष्यवृत्ती वस्तीग्रहे,आश्रम शाळा, परीक्षा पूर्व परीक्षा केंद्र इत्यादी योजनेसाठी सन 2013-14 या वर्षामध्ये भरीव तरतूद करण्यात आली आहे.

**6.आदिवासी समाजाची आर्थिक स्थिती**

भारतातील आदिवासी समाजाची आर्थिक समस्या ही मूलभूत व महत्त्वपूर्ण आहे. आजच्या युगात मानवाची झालेली वैज्ञानिक प्रगती विविध सुविधांची झालेली सोय इत्यादी लक्षात घेता भारतातील 7 टक्के आदिवासी अजूनही पारंपारिक अवस्थेतील जीवन जगतात. महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वतातील ठाकूर लोक वर्षातून चार महिने दोन वेळेला कसेबसे येऊ शकतात. बाकीचे सर्व दिवस बोरी करवंदे, झाडपाला यावरती काढत असतात.

भारतातील संख्या आदिवासी जमाती दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहे. आदिवासी शेत जमिनी प्रमुख्याने पर्वतीय क्षत्राखाली आहे.तरी मुरमाड आणि घोटाळा आहे. शिवाय निसर्गावर अवलंबून आहे.म्हणून शेतीतून येणारे उत्पन्न कमी आहे. आदिवासी कर्जबाजारीपणाचा प्रारंभ भारतात विनिमयापासून सुरु झाला. आदिवासी समाजाची उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांना कर्ज काढणे भाग पडले. आदिवासीच्या फायदा जामीनदार, सावकार, व्यापारी, जंगलाचे ठेकेदार अशा सर्वांनीच घेतला त्यामुळे आदिवासी समाजाला आर्थिक गरज भागविण्यासाठी कर्ज घेण्यासाठी भागच पडते.

अ.स्थानांतरित शेती

आदिवासी जीवन पद्धतीतून निर्माण झालेली ही समस्या आहे आजही त्यांच्यामध्ये स्थानांतरित शेती रोड आहे त्याचबरोबर या पद्धतीने विलक्षण जंगलतोड होऊन संपत्ती नष्ट होत आहे.त्यामुळे आदिवासी समाजाला शेतीसाठी नवीन जागा पावी लागते.

ब.व्यापारी दलाल सावकार

आदिवासी समाजाला व्यापार दलाल सावकार भरमसाठ व्याजाने कर्ज देऊन आदिवासीच्या जमिनी पूर्णपणे गिळंकृत केल्या.पैसे उसनवार देताना सावकार त्याच्यावर विपरी त अटी घालीत व कर्ज घेणाऱ्य आदिवासी हे सावकाराचे जवळजवळ गुलाम होत म्हणून आदिवासी समाजाची अवस्था भूमीहीन मजुरा सारखी झाली.

क.जंगल कामगाराचे शोषण

जंगल कंत्राटदार झाडे तोडण्यासाठी मजूर म्हणून कामाला लावतात. हेच कंत्राटदार स्वतःच्या फायद्यासाठी आदिवासींना कमी पैशामध्ये जास्तीचे काम करून घेतात. आपल्याला हमखास मजूर मिळावे म्हणून आदिवासींना अगोदर पैसे देऊन बांधून टाकीत. अत्यंत कमी मजुरीवर मोठ्या काळासाठी त्यांच्याकडून अधिक श्रम करून घेतली जातात. शिवाय या अनुषंगाने होणारे त्यांचे स्थलांतर ही फार मोठी समस्या आहे.

**7 आदिवासी जमातीच्या आरोग्य स्थितीची अध्ययन करणे .**

आदिवासी समाज हा दुर्गम प्रदेशात प्रदेशात व जंगल दऱ्याखोऱ्यात राहत असल्यामुळे वर्षातून कित्येक दिवस आदिवासींना शुद्ध पाणी मिळत नाही. स्वच्छ राणीमानाचा आभाव , आरोग्य सोयीचा अभाव, निरक्षरता जागृतीचा अभाव, अंधश्रद्धा,अपुरावा निकृष्ट आहार, अस्वच्छ पाणी यामुळे मलेरिया, हगवण,
पोटाचे विकार, कातडीचे रोग त्यांच्याशी त्यांना सामना करावा लागतो. त्यामुळे आदिवासी जमातीमध्ये कुपोषण ही मोठ्या प्रमाणात आढळते. ठाणे,अमरावती, धुळे जिल्हयात कुपोषणामुळे बालमृत्यूचे प्रमाण आढळते. शासनाने आदिवासी मधील कुपोषण आणि रोगराई घालवण्यासाठी 1995 साली नवसंजीवन योजना आखली आहे.या योजनेचा लाभ आदिवासी क्षेत्रांना मोठ्या प्रमाणात होत आहे.

**8 आदिवासी समाजाचे शैक्षणिक स्थितीचा अभाव**

आधुनिकीकरण व जागतिकरणाचे युगात सुद्धा आदिवासी समुदाय कोसो दूर असल्याची दिसून येते. आदिवासी समुदायाचा शैक्षणिक आर्थिक व सामाजिक विकासाचा वेग मंद असल्याचे दिसून येते. त्यामुळे आधुनिकीकरणाच्या जगात त्याची उकल करणे आदिवासी विकासासंदर्भात अत्यंत महत्त्वाचे आहे. आदिवासी शिक्षणासाठी सरकारी योजना अत्यंत चांगल्या असूनही मिळावे तेवढे यश शिक्षणाच्या बाबतीत मिळाले नाही.

**संदर्भ ग्रंथ**

1. डॉ आगलावे प्रदीप- आदिवासी समाजाचे समजशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर
2. गारे गोविंद (२००३) आदिवासी विकास योजना, आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे
3. देशमुख सुदर्शन (2007), आदिवासी समाजाची दारिद्र्य, नांदेड, निर्मल प्रकाशन.
4. गारे गोविंद,(1997), आदिवासीचे शिक्षण, औरंगाबाद, साकेत प्रकाशन.
5. नाडगोंड गुरुनाथ, (1979), भारतीय आदिवासी, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर.
6. वार्षिक आदिवासी विकास उपयोजना, (२००७-८) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, पुणे, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय.